I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 224-230
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# महाराष्ट्रातील ग्रामीण आर्थिक विकासामध्ये टसर रेशीम उद्योगाची भुमिका (सन २०१०—२०११ ते २०१९—२०२०)

**सुरेन्द्र पंढरीनाथ बोरडे[१] व जे.एम. काकडे[२]**
[१]गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
[२]डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author :- suryaborde2785@gmail.com

Communicated : 30.01.2023 | Revision : 07.03.2023 Accepted : 05.04.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

आंतरराष्ट्रीय विश्वात रेशीम उद्योगाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जडण—घडणीत आणि महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात टसर रेशीम उद्योगाचे महत्त्व वाढत चाललेले दिसून येत आहे. आज देशात व विदेशामध्ये सुद्धा टसर रेशीम कापडाची मागणी सातत्याने वाढत असल्याने टसर रेशीम उत्पादनाचे एक पारंपारिक कार्यापासून उद्योगाचे रुप धारण केलेले आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये महाराष्ट्रातील टसर रेशीम उद्योगाचा अभ्यास करणे, शासनाच्या विविध योजनाचा अभ्यास करणे व रोजगाराच्या संधी व भविष्यातील उपलब्धता याचा आढावा घेणे व उद्देश निश्चित करून त्या आधारे या उद्योगामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये थोडीफार रोजगार निर्मिती झाली आहे व हा उद्योग वन आधारित पुरक व्यवसाय आहे. अशी परिकल्पना मांडण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधन लेखातील उद्देशाला अनुसरून संशोधन लेखात रेशीम उद्योगाचा इतिहास व विकास, महाराष्ट्रातील टसर रेशीम उद्योगाची प्रगती तसेच या उद्योगाचा विकास व विस्तार होण्यासाठी शासनाच्या विविध योजनाचा आढावा घेवून ग्रामीण आर्थिक विकासामध्ये टसर उद्योगाची भुमिका याचा अभ्यास करण्यात आला आहे.

**मुख्यशब्द :** भारतीय अर्थव्यवस्था . सामाजिक स्तर रेशीम उत्पादन पर्यावरण पुरक

## प्रस्तांवना :

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. शेती व्यवसायातून मिळणारे उत्पन्न अनिश्चित व जोखीम स्वरुपाचे असते. त्यातील अनिश्चित व जोखीमचे कार्य कमी करण्यासाठी या क्षेत्राला पुरक व्यवसायाची जोड दिली गेली तर शेतकऱ्याचे उत्पन्न वाढून त्याचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होईल.

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास राष्ट्रीय उत्पन्नात किती भर पडली यावरून ठरत असतो. परंतु राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीपेक्षा दरडोई उत्पन्नात किती वाढ झाली हे महत्त्वपूर्ण ठरेल. आर्थिकदृष्ट्या देश प्रगत होण्यासाठी लोकसंख्येतील वाढीच्या प्रमाणापेक्षा उत्पन्न वाढीचे प्रमाण जास्त असणे आवश्यक आहे. अविकसित व विकसनशील देशातील लोकांची बचतीची क्षमता कमी असल्याने सरकारला प्रत्यक्ष गुंतवणुक कार्यात भाग घ्यावा लागतो. कारण खाजगी गुंतवणुक लोकांना रोजगार पुरवण्यास व साधनसामग्रीचा पुरेपूर उद्योग करण्यास अपुरी ठरते. आर्थिक विकासाच्या धोरणात अनेक बाबींचा समावेश होतो. जसे मागास प्रदेशाचा विकास, ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी, मुलभूत सोईचा पुरवठा, नैसर्गिक साधन संपत्तीचा शोध व पर्याप्त वापर इत्यादी.

रेशीम भारतीय संस्कृतीशी जुडलेला एक अभिन्न घटक आहे. फक्त भारतामध्येच सर्व प्रकारचे रेशीम उत्पादन घेतले जातात. रेशीम उत्पादनामध्ये भारत विश्वामध्ये चीन नंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत रेशीम उत्पादनासोबत त्याचा मोठ्या प्रमाणात उपभोक्ता देश आहे. जागतिक बाजारपेठेत रेशीम कापडास मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

रेशीम उत्पादन करणाऱ्या जगातील किटक प्रजातीपैकी सर्व चारही प्रजाती भारतात वेगवेगळ्य भागात आढळतात. त्या प्रजाती म्हणजे तुती, टसर, मुगा, एरि होय. या सर्व प्रजातीपासून सन २०१९–२०२० मध्ये तुती (२५२३९ मे. टन) टसर (३१३६ मे.टन), मुगा (२४१ मे.टन), एरि (७२०४ मे.टन) असे एकूण ३५८२० मे.टन रेशमाचे उत्पादन झाले. त्यामध्ये ७०.४ टक्के हिस्सा हा तुती रेशीमाचा तर ८.७ टक्के हिस्सा टसर रेशीमाचा आहे.

**उद्देश :**

(१) महाराष्ट्रातील टसर रेशीम उद्योगाचा अभ्यास करणे.

(२)महाराष्ट्रातील टसर रेशीम उद्योगाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनाचा अभ्यास करणे.

(३)महाराष्ट्रातील टसर रेशीम उद्योगातील रोजगाराच्या संधी व भविष्यातील उपलब्धता याचा आढावा घेणे.

**परिकल्पना :**

(१) टसर रेशीम उद्योगातून महाराष्ट्रातील ग्रामीण भागात थोडीफार रोजगार निर्मिती झाली आहे.

(२)महाराष्ट्रातील टसर रेशीम उद्योग हा वन आधारित पुरक व्यवसाय आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेख “महाराष्ट्रातील ग्रामीण आर्थिक विकासामध्ये टसर रेशीम उद्योगाची भुमिका” या विषयावर असून प्रस्तुत संशोधन द्वित्तीय संमकावर आधारित असून तो वर्णनात्मक आहे. उपलब्ध माहितीचे विश्लेषण तुलनात्मकरित्या करून निष्कर्ष काढण्यात आले आहे. या संशोधनाचा कालावधी २०१०–२०११ ते २०१९–२०२० असा १० वर्षाचा घेतला आहे. ज्या संदर्भसाहित्याचा वापर लेखासाठी केला आहे, त्याची संपूर्ण माहिती शेवटी संदर्भ ग्रंथात देण्यात आली आहे.

**रेशीम उद्योगाचा इतिहास व विकास :**

रेशीम उद्योगाची सुरवात कशी झाली, नेमका शोध कधी व कुठे लागला याची माहिती अनेक दंतकथामधून वाचायला मिळते. ५००० वर्षापुर्वी सर्वप्रथम रेशीम उद्योगाची सुरवात चीन मध्ये झाली असावी व रेशीम अळ्यचे संगोपन तंत्र चीनमध्ये विकसित झाले असावे असे काही अध्ययनात आढळून आले. रेशीम धाग्यापासून सुंदर व टिकाऊ वस्त्रे तयार करण्यात येवू लागले. वस्तु विनिभयासाठी तेव्हा चीनमध्ये रेशमाचा वापर होत असे व तसेच त्याची निर्यात होत असे. रेशीम निर्मितीच्या या पद्धतीविषयी चीनमध्ये अत्यंत गुप्तता पाळण्यात आली व या गुप्ततेचा भंग करणाऱ्याला बंदनामीलाच नव्हे तर मृत्युदंडालाही समोर जावे लागे. अशा तऱ्हेने जवळ–जवळ तीन हजार वर्ष चीनने या बाबतीत गुप्तता पाळली व त्यामुळे या उद्योगात त्याची आजही मक्तेदारी टिकून राहिली.

१३ व्या शतकापर्यंत इटली, फ्रान्स, भुमध्य सागरावरील बेटे येथे रेशीम उघ्त्पादनाला सुरवात झाली. १६ व्या शतकात फ्रान्सकडून, अमेरिका, जर्मनी, इंग्लंड अशा अनेक देशात रेशीम निर्मितीचे तंत्र पोहचले व त्याचा जगभर विस्तार झाला. चीनमध्ये चीनी व अरबी व्यापारी उंट वघोज्यावलन टि–इन–शुले, शी–हाय–चरचेन या मध्य चीनमधील वस्त्यातून टकला माकन वाळवंटाला वळसा घालून पामीर खिंडीतून पशिया–इस्तबुल मार्गे दक्षिण युरोपात व ताश्कंद वरून मध्य युरोपमध्ये सहाव्या शतकापर्यंत या खुश्कीच्या मार्गाने रेशीमची वाहतुक करत असे. अशा ६४०० कि.मी. रेशीम मार्गाची माहिती इ.स. १९८५ मध्ये युनास्कोने घेतली आहे व याच रेशीम मार्गालाच 'सिल्क रूट' असे म्हणतात.

एका दंतकथेनुसार एका चीनी राजाने भारतीय राजकुमारीशी विवाह केला. या राजकुमारीने आपल्या शिरोभुषणाच्या अस्तरात रेशीम अळ्यची अंडी व तुतीच्या

बिया लपवून चीनमधून गंगा, ब्रम्हपुत्राच्या खोऱ्यात आणली. तेव्हापासून भारतात रेशीम निर्मितीला सुरवात झाली. रामायण, महाभारत या काळात रेशीमला 'कौतेयवस्त्र' या नावाने ओळखले जात असे. कौटील्याच्या अर्थशास्त्रात ३२ व्या अध्यायात रेशीमचे वर्णन केले आहे. मोगल राजवटीत रेशीम उद्योग भरभराटीला आला व टिपु सुलतानच्या काळात या उद्योगास भारतात राजाश्रय मिळाला. ब्रिटिश काळात ईस्ट इंडिया कंपनीने रेशीमची निर्मिती मोठ्या प्रमाणात करून इतर देशाना निर्यात केले.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रेशीम उद्योगाचा विस्तार व विकास व्हावा यासाठी १९४९ मध्ये राष्ट्रीय स्तरावर बेंगलोर येथे केन्द्रीय रेशीम मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळाद्वारे रेशीम उद्योगासाठी अनेक विकासाच्या योजना राबवण्यात आल्या आहे.

रेशीम उद्योगासाठी असणारे महाराष्ट्रातील हवामान व वातावरण पोषक आहे. रेशीम उद्योग शेती व जंगलावर आधारित असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगारीचे दालन खुलणारा व्यवसाय आहे. राज्यामध्ये तुती व टसर (वन्य) अशा दोन्ही प्रकारचे रेशीमचे उत्पादन घेतले जाते. राज्यातील पुर्व विदर्भ (चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया) वगळता उर्वरित महाराष्ट्रात तुती रेशीम उत्पादन घेतले जाते. महाराष्ट्र शासनाने राज्यात रेशीम उद्योगाचा विस्तार व विकासासाठी १ सप्टेंबर १९९७ मध्ये स्वतंत्र रेशीम संचालनाची स्थापना नागपूर येथे केली आहे. तसेच राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा रेशीम कार्यालयाची स्थापना करून रेशीम उद्योगाला चालना देण्याचे कार्य सुरू आहे.

**महाराष्ट्रातील टसर रेशीम उद्योग :**

टसर हा शब्द संस्कृत शब्द त्रसरा ;ज्त्ंेंद्ध या शब्दापासून तयार झाला आहे. टसर रेशीम उद्योग पुर्णत: नैसर्गिक व वनावर आधारित उद्योग असल्याने त्याला वन्य रेशीम सुद्धा म्हटले जाते. महाराष्ट्रातील पुर्व विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वनाचे प्रमाण आढळतात. एकट्या विदर्भाचा विचार करता ५४.८० टक्के वनक्षेत्र अतिघनदाट श्रेणीमध्ये आढळतात. या वनावर आधारित अनेक व्यवसाय पारंपारिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात पुर्वीपासून चालत आहे. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यामध्ये नैसर्गिकरित्या उष्णकटीबंधीय जंगलात टसर अळीसाठी लागणारे ऐन व अर्जुन खाद्यवृक्ष मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. उष्णकटीबंधीय टसर रेशीम किटक एन्थरिया मायलेटा परिवाराचा सदस्य असून या जंगली किड्यची खाद्य झाडे ५० पेक्षा जास्त आहेत. त्यापैकी प्राथमिक श्रेणीत ऐन व अर्जुन या खाद्यवृक्षांचा समावेश असून हे नैसर्गिकरित्या उष्णकटीबंधीय जंगलात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

पुर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यामध्ये २००–२५० वर्षापासून सुमारे ३००० आदिवासी कुटुंबे पारंपारिकरित्या टसर कोष उत्पादन करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यातही ऐन व अर्जुनाची झाडे उपलब्ध आहे. बायफ या संस्थेने ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना टसर कोष उत्पादन करण्यासाठी प्रवृत्त केले असून त्याचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यास मदत होत आहे. लाभार्थी जंगलातील ऐन व अर्जुनाच्या झाडावर टसर अळ्यचे संगोपन करून टसर रेशीम कोषाचे वर्षातून तीन पिके/आवर्तने घेतात. टसर रेशीम शेती एक पुरक व्यवसाय म्हणून आदिवासी व ढिवर समाज हा उद्योग मोठ्या प्रमाणात करत आहे. जंगलातील टसर कोष उत्पादन करणाऱ्या लाभार्थ्याकरिता वनसंवर्धन कायदा शिथील करण्यात आला आहे. बहुतेक हे लाभार्थी दारिद्र्य रेषेखाली असल्याने त्याच्याकरिता राज्य व केंद्र शासन रेशीम

संचालना मार्फत ७५ टक्के अनुदानावर अंडीपुजाचा पुरवठा, प्रशिक्षण, शैक्षणिक सहल, साहित्या पुरवठा व वेळोवेळी मार्गदर्शन करतात. पुर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा टसर रेशीम कार्यालय स्थापन करून त्या मार्फत टसर रेशीम उद्योगाचा विस्तार व विकास करण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबवितात. तसेच शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या कोषाची हमीभावाने खरेदी करून त्यापासून धागानिर्मिती करतात. नागपूर, भंडारा, आंधळगाव इत्यादी ठिकाणी टसर साज्या व कापडनिर्मितीचे काम सुरू आहे. कोषोत्तर उत्पादनामध्ये कोषाचे धागाकरण, कापड विणकाम व विक्री इत्यादीमध्ये सुद्धा मोठ्य प्रमाणात महिलांना रोजगार पुरवठा करण्याचे कार्य सुरू आहे.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन २०१०–२०११ मध्ये टसर खाद्यवनक्षेत्र ७४०० हेक्टर्स असून त्यामध्ये सन २०१८–२०१९ मध्ये १०९०० हेक्टर्स झाले. आधार वर्षाच्या तुलनेत २०१८–२०१९ मध्ये त्यामध्ये ४७.२ टक्के वाढ झाली असे दिसून येते. सर्वात जास्त खाद्यवृक्ष वनक्षेत्रामध्ये वाढ २०१६–२०१७ मध्ये १२४५७ हेक्टर्स झाल्याचे दिसून येते. तसेच सान २०१०–२०११ मध्ये टसर कोष उत्पादन १६८ लक्ष असून त्यामध्ये वाढ होवून सन २०१८–२०१९ ४१६ लक्ष कोष उत्पादन झाले. आधार वर्षाच्या तुलनेत सन २०१८–२०१९ मध्ये कोष उत्पादनात १४७.६ टक्के वाढ झाली. सर्वात जास्त कोष उत्पादन सन २०१६–२०१७ मध्ये ५०१ लक्ष झाल्याचे दिसून येते. याचप्रमाणे सन २०१०–२०११ मध्ये टसर लाभार्थी/शेतकरी संख्या १८५० हजार असून त्यामध्ये थोडी घट होवून सन २०१८–२०१९ मध्ये १८०१ हजार झाली. आधार वर्षाच्या तुलनेत सन २०१८–२०१९ मध्ये –२.६ टक्के घट झाली. सर्वात जास्त टसर लाभार्थी संख्येत वाढ ही सन २०१७–२०१८ मध्ये २९६० हजार झाल्याचे दिसून येते.

सन २०१०–२०११ मध्ये टसर रेशीम उद्योगात १०.११ लक्ष मनुष्य दिवस रोजगार निर्मिती असून त्यामध्ये सन २०१८–२०१९ मध्ये २३६.४ टक्के वाढ होवून ३४.०२ लक्ष मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाल्याचे दिसून येते. सर्वात जास्त रोजगार निर्मिती ही सन २०१६–२०१७ मध्ये ४१ लक्ष मनुष्य दिवस झाल्याचे दिसून येते. तसेच सन २०१०–२०११ मध्ये अंडीपुंज वाटप ५.७५ लक्ष असून त्यामध्ये वाढ होवून सन २०१८–२०१९ मध्ये १०.९० लक्ष झाले. आधार वर्षाच्या तुलनेत सन २०१८–२०१९ मध्ये अंडीपुंज वाटपमध्ये ८९.५ टक्के वाढ झाल्याची दिसून येते. सर्वात जास्त अंडीपुज वाटप सन २०१६–२०१७ मध्ये १२.३५ लक्ष झाल्याचे दिसून येते. सन २०१०–२०११ मध्ये टसर रेशीम धागा निर्मिती ६.७४ हजार कि.ग्रॅ. असून त्यामध्ये वाढ होवून सन २०१८–२०१९ मध्ये २२.६८ हजार कि.ग्रॅ. झाले. आधार वर्षाच्या तुलनेत सन २०१८–२०१९ मध्ये धागानिर्मिती मध्ये २३६.६ टक्के वाढ झाली. सर्वात जास्त धागा निर्मितीमध्ये वाढ सन २०१६–२०१७ मध्ये २७.३४ हजार कि.ग्रॅ. झाल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्रातील ग्रामीण आर्थिक विकासामध्ये टसर रेशीम उद्योगाची भूमिका :**

महाराष्ट्रातील ग्रामीण आर्थिक विकासामध्ये टसर रेशीम उद्योगाची भूमिका खालील प्रमाणे सांगता येईल.

**(१) रोजगार निर्मिती :**

महाराष्ट्रात ग्रामीण भागामध्ये टसर रेशीम व्यवसाय हा एक पुरक व्यवसाय म्हणून जवळपास ३००० कुटुंबे या व्यवसायात गुंतलेले आहे. या व्यवसायात सन २०१०–२०११ मध्ये १०.११ लक्ष मनुष्य दिवस असलेला रोजगार सन २०१८–२०१९ मध्ये २३६.४ टक्के वाढ

होवून ३४.०२ लक्ष मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाल्याचे दिसून येते. म्हणून भविष्यात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराची दालने उघडणारा व्यवसाय म्हणून याकडे पाहिले जाते.

**(२)अल्प गुंतवणुक :**

राज्य शासन व केन्द्र शासनामार्फत शेतकऱ्याना ७५ टक्के अनुदानावर अंडीपुज पुरवठा व इतर संगोपन साहित्याचा पुरवठा होत असल्याने लाभार्थी स्वत: जवळील उपलब्ध साहित्यातून नैसर्गिक जंगलात वाढणाऱ्या ऐन व अर्जुनच्या झाडावर टसर रेशीम अंळीचे संगोपन करून कोष उत्पादन घेतात. त्यामुळे टसर रेशीम व्यवसाय सुरू करण्यासाठी जास्त भांडवलाची गरज नसते.

**(३)कमी कालावधीत जास्त उत्पन्न :**

टसर रेशीम व्यवसायामध्ये वर्षातून ३ पिके/आवर्तने घेतली जाते. एका आवर्तनाचा कालावधी ३० ते ४५ दिवसाचा असतो. इतर व्यवसायाच्या तुलनेत कमी भांडवलात, कमी कलावधीत अधिक उत्पन्न देण्याची क्षमता या व्यवसायामध्ये आहे.

**(४)समाजातील दुर्बल घटकासाठी सहाय्यक व्यवसाय :**

टसर रेशीम व्यवसाय हा अल्प गुंतवणुकीत अधिक उत्पन्न देणारा व्यवसाय असून जवळील उपलब्ध साहित्यातून हा व्यवसाय सुरू करू शकतात. या व्यवसायामुळे दुर्बल घटकांना रोजगाराची संधी मिळून त्याचे सामाजिक व आर्थिक जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

**(५)पर्यावरण पुरक व्यवसाय :**

टसर रेशीम कोषाचे उत्पादन नैसर्गिक जंगलाच्या सानिध्यात केले जाते. त्यामुळे त्याला वन्य रेशीम सुद्धा म्हणतात. पर्यावरणाला हानी होईल अशा कोणत्याही रासायनिक घटकाचा या व्यवसायात वापर केला जात नाही. त्यामुळे टसर रेशीम व्यवसाय वनआधारित पर्यावरण पुरक व्यवसाय आहेत.

**निष्कर्ष :**

वरील विषयाच्या अभ्यासावरून लक्षात येते की, महाराष्ट्रातील ग्रामीण आर्थिक विकासामध्ये टसर रेशीम उद्योगाचे महत्व अनन्यसाधारण आहे. टसर रेशीम उद्योग हा वनावर आधारित उद्योग असल्याने ज्या ठिकाणी वनाचे प्रमाण जास्त आहे त्या ठिकाणी हा व्यवसाय केला जातो. टसर किटकास लागणारे खाद्यवृक्ष पुर्व विदर्भातील जंगलात उपलब्ध असल्याने येथील आदिवासी व ढिवर समाजातील लोक पुरक व्यवसाय म्हणून हा उद्योग करीत आहे. राज्य शासनाने टसर रेशीम उद्योगासाठी जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत राज्य व केन्द्र पुरस्कृत विविध योजना राबविल्यामुळे सन २०१०—२०११ च्या तुलनेत सन २०१८—२०१९ मध्ये या उद्योगाचा विस्तार व विकास मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. इतर व्यवसायाच्या तुलनेत हा व्यवसाय अल्प गुंतवणुकीत व अल्प काळात अधिक लाभ देणारा व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये टसर रेशीम उद्योगामुळे महिला, युवक व बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाल्याने त्याचे सामाजिक व आर्थिक जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

**संदर्भ :**

आगलावे प्रदीप, 'सामाजिक संशोधन पद्धती'

कलंत्री ल.भि., 'टसर रेशीम उद्योगाचे तंत्र व मंत्र'

Mahasilk, Maharashtra.gov.in रेशीम संचालनालय, नागपूर

जिल्हा टसर रेशीम कार्यालय, पाथरी, चंद्रपूर

International Sericultural Commission, United Nations

https://vishwakosh.marathi.gov.in रेशीम, मराठी विश्वकोश

### तक्ता क्र. १

### महाराष्ट्रातील टसर खाद्यवृक्ष क्षेत्र, कोष उत्पादन, लाभार्थी संख्या, रोजगार निर्मिती, अंडीपुज वाटप, धागा निर्मिती दर्शविणारा तक्ता

(आधार वर्ष २०१०-२०११)

(सन २०१०-२०११ ते २०१८-२०१९)

| वर्ष | टसर खाद्यवृक्ष वनक्षेत्र (हेक्टर्स) | टसर कोष उत्पादन (लक्ष) | टसर लाभार्थी संख्या (हजार) | रोजगार निर्मिती (लक्ष मनुष्य दिवस) | अंडीपुज वाटप (लक्ष) | धागा निर्मिती (हजार कि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१०-२०११ | ७४०० | १६८ | १८५० | १०.११ | ५.७५ | ६.७४ |
| २०११-२०१२ | ६०१५ | ३०८ | २७०८ | १८.५२ | ८.८७ | ९.७६ |
| २०१२-२०१३ | ८७८८ | २४३ | २२५९ | १४.६३ | ९.४६ | ९.१५ |
| २०१३-२०१४ | ६४९१ | १८७ | १४९२ | १५.३ | ६.३८ | १०.१९ |
| २०१४-२०१५ | ९८८७ | ३४८ | २८११ | २८.४५ | ११.०३ | १८.९७ |
| २०१५-२०१६ | १०७३७ | ३९४ | २७४४ | ३२.२५ | ११.०२ | २१.५ |
| २०१६-२०१७ | १२४५७ | ५०१ | २९६० | ४१ | १२.३५ | २७.३४ |
| २०१७-२०१८ | १०६६९ | ३५४ | २९२० | २८.९९ | १०.६७ | १९.३३ |
| २०१८-२०१९ | १०९०० | ४१६ | १८०१ | ३४.०२ | १०.९० | २२.६८ |

**तक्ता क्र. २**

**रेशीम विभागामार्फत टसर रेशीम उद्योगासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना**

| योजना | योजनेचे स्वरूप | युनिट कॉस्ट | हिस्सा | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | केन्द्र | राज्य | लाभार्थी |
| **जिल्हा वार्षिक योजना** | (१) अंडीपुंज पुरवठा ७५ टक्के अनुदान<br>(२) शेतकरी प्रशिक्षण रू. १००० लाभार्थी<br>(३) शेतकरी अभ्यास दौरा रू. १०० व प्रवास खर्च<br>(४) शासकीय फार्म व रिलींग केन्द्र अंतर्गत खर्च<br>(५) शासकीय अंडीपुज केन्द्र अंतर्गत खर्च<br>(६) टसर रिल्ड यार्न उत्पादनासाठी रू. १०० प्रतिकिलो प्रमाणे प्रोत्साहनात्मक अनुदान | | | | |
| **एकात्मिक रेशीम विकास योजना 'सिल्क समग्र' केन्द्रीय रेशीम मंडळ** | **(अ) टसर कोषापासून धागाकरण यंत्र खरेदी करण्यासाठी** | | | | |
| | (१) रिलीगसह व्टिस्टिग संयत्र उभारणे | रू. २८००० | ५०% | २५% | २५% |
| | (२) वेटरिलीग संयत्र | रू. ३०००० | ५०% | २५% | २५% |
| | (३) मोटार चलित तथा पायाने चालविणारे कताई यंत्र | रू. ७००० | ५०% | २५% | २५% |
| | (४) सौर उर्जेवर चालविणारे कताई यंत्र | रू. २१००० | ५०% | २५% | २५% |
| | (५) २ स्टेप रिलिग कम व्टिस्टीग संयत्र उभारणी | रू. २८००० | ५०% | २५% | २५% |
| | (६) बुनियादी रिलीग मशीन | रू. ११००० | ५०% | २५% | २५% |
| | (७) कामधेनु रिलीग मशीन | रू. २३००० | ५०% | २५% | २५% |
| | (८) टसर धगाकरण पुर्ण यंत्र सामुग्री | रू. ११५०००० | ५०% | २५% | २५% |
| | **(ब) टसर रेशीम बीज उत्पादन विभागासाठी योजना** | | | | |
| | (१) खाजगी अंडीपुज निर्मितीसाठी सहाय्य | रू. ५००००० | ५०% | २५% | २५% |
| | (२) टसर बीज गुणन केन्द्र बळकटी करण्यासाठी सहाय्य | रू. ६०००००० | ५०% | २५% | २५% |
| | (३) उष्ण कंटीबधीय टसर अंडीपुज संशोधन करणाऱ्या टसर लाभार्थ्यास सहाय्यता योजना | रू. ५५००० | ५०% | २५% | २५% |